स्थायी समितीच्या **गुरुवार** दिनांक **20–02–2014** रोजी दुपारी **03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | **सभापती** |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 12. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 13. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 2. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 3. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 677</u> :– नागपूर महानगरपालिकेमध्ये जन्म–मृत्यु विभागातील जन्म–मृत्युचे देण्यात येणाऱ्या दाखल्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क इतर महानगरपालिकेच्या तुलनेत फारच कमी असल्यामुळे या शुल्कामध्ये खालील प्रमाणे शुल्क आकारण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

अ) नियमाप्रमाणे पहिली निःशुल्क प्रत (21 दिवसाचे आत जन्म –मृत्यू नोंदणी असल्यास ) व दुसऱ्या प्रतीसाठी बी.पी.एल. कार्ड दाखविल्यास दाखला निशुल्क देण्यात येईल.

ब) साधारण जन्म – मृत्यू दाखला रु.5/– प्रति प्रत ऐवजी रु.20/– प्रती प्रत
क) जन्म –मृत्यू दाखले ऑन लाईन प्रति प्रत रु.100/– व
ड) तात्काळ प्रतीकरिता सध्या अस्त्वात असलेले शुल्क रु.30/– प्रती प्रत ऐवजी रु.50/– प्रती प्रत करण्याची कार्यालयीन शिफारस आहे.

<u>ठराव क्रमांक 678</u> :– महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत एपीएल महिलांना प्रती वार्ड 20 महिलांची निवड करुन नागपूर महानगरपालिके अंतर्गत असलेले 145 वार्ड व 5 मनोनीत सदस्य असे एकूण 150 X 20 = 3000 महिलांना व्यावसायीक प्रशिक्षण द्यावयाचे आहे. यात प्रती प्रशिक्षणार्थी रु.2000/– प्रमाणे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस शासनाने ठरवून दिल्यानुसार शुल्कापोटी द्यावयाचे आहे. त्यापैकी लाभार्थ्यांचा हिस्सा 10 टक्के (रु.200) असून उर्वरित 90 टक्के ( रु.1800/–) महानगरपालिकेला द्यावयाचे आहे. या प्रशिक्षणाकरिता 1800 X 3000 = 54.00 लक्ष अंदाजीत खर्च अपेक्षित आहे. याकरीता दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवून प्रशिक्षण संस्थेकडून स्पर्धात्मक दर मागविण्यात येईल. हा खर्च पद क्र.274 महिला बाल कल्याण समिती मधून करण्यात येईल. तरी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवून स्पर्धात्मक दर मागविण्यासाठी, तसेच यावर होणारा अंदाजीत खर्च रु. 54.00 लक्षाच्या खर्चाकरीता मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 679</u> :– प्रभाग क्र. 51 ब, अंतर्गत लक्ष्मीनगर येथे रस्त्याचे डांबरी करण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस. के.मेहता यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 6.03 टक्के अधिक दराची रु. 3176855/– ( एकतीस लक्ष छहात्तर हजार आठशे पंचावन) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 3176855/– पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 680</u> :– नागपूर शहरात फुटपाथ विविध ठिकाणी उभारलेल्या बॅनर स्टॅन्डवर जाहिरातीचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेली मे.मिराज यांची रू. 93,00,000/– ची महत्तम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 681</u> :– प्रभाग क्र. 72 अंतर्गत विमानतळ, सोनेगांव,समर्थनगरी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अंकीत कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 17.62 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 2.1634 टक्के ने अधिक दराची रु. 2603579/– ( सव्वीस लक्ष तिन हजार पाचशे एकोनअंशी ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 680 ( A42001374612) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 2603579 लक्ष पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 682</u> :– प्रभाग क्र. 69 अ व ब अंतर्गत खामला येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के.नगरारे यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 19 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 2.475 टक्के ने अधिक दराची रु. 3569276/– ( पसतीस लक्ष एकोनसत्तर हजार दोनशे छहात्तर ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम फीक्स प्रायरीटी अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 2999392 लक्ष पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 683</u>** :– प्रभाग क्र. 69 अ अंतर्गत जेतवन सोसायटी, हावरे ले आऊट, अग्ने लेआऊट, पायोनियर सोसायटी व मिलींदनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.एम.ए. कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 18.00 टक्के अधिक दराची व नविन सी. एस.आर.दरापेक्षा 2.425 टक्के ने अधिक दराची रु. 5899244/– ( अठ्ठावन लक्ष नयान्व हजार दोनशे चौरेचाळीस ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 5899244 लक्ष पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 684</u>** :– प्रभाग क्र. 55 अ अंतर्गत विद्या विहार पोस्टल ऑडीट कॉलनी आणि सहास कॉलनी येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.एम. ए. कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 14.68 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 2.49 टक्के ने अधिक दराची रु. 5335063/– ( त्रेपन लक्ष पसतीस हजार त्रेसष्ट ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 5335063 लक्ष पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 685</u>** :– प्रभाग क्र. 7 (ब) बाबाफरीदनगर येथे नाल्याचे भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रु. 2999283/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षांत पद क्र.A43901370812 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 686</u>** :– प्रभाग क्र. 72 क येथील सहकारनगर ते गजाननधाम पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के. कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 14 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 2.14 टक्के ने अधिक दराची रु. 2837025/– (अठ्ठावीस लक्ष सदतीस हजार पंचवीस फक्त ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 2837025/– पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 687</u>** :– नागपूर महानगरपालिका अंतर्गत बीएसयुपी–जएनएनयुआरएम योजनेअंतर्गत केंद शासनाचे 130 सीएसएमसी बैठक दि. 23.03.201 अन्वये मंजूर महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाचे दि. 6.07.2013 चे पत्रान्वये मंजूर घराचे बांधकाम करण्याचे व निविदा मंजूर करण्याचे व त्यासाठी मनपाचा हिस्सा रु. 6852371/– तरतूद मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 688</u>** :– नागपूर महानगरपालिका हद्दीतील गरीबांकरिता तसेच म.न.पा. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकरिता स्वस्त घरकुल बांधण्याचा प्रस्ताव विचारात घेऊन तसेच

उपरोक्त योजनेअंतर्गत आर्थिक दृष्टया मागासलेल्या नागरिकांकरिता आणि मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकरिता स्वस्त घरे बांधुन देण्याचे सन 2013–14 चे अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आलेले आहे. याबाबत पुढील प्रमाणे मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

3)

(अ) **प्रारुप धोरण :**

नागरिकांसाठी स्वस्त घरकुल योजना राबविण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दती ठरवुन धोरणात्मक निर्णय घेणे.

(1) **समिती गठीत करणे** : नागरिकांकरिता स्वस्त घरकुल (Affordable Housing) योजनाराबविण्यास्तव विविध भौतिक सुविधा, बांधकाम किंमत लाभार्थी निवड, गाळयाचे आरक्षण, निश्चित कार्यपध्दती बांधकाम विक्री व भाडे तत्वावर देण्यासंबंधी अटी व शर्ती व देखभाल दुरुस्ती संबंधी निर्णय इत्यादी ठरविण्याचे दृष्टीने विशेष समिती गठीत करण्याचे प्रस्तावित आहे. समितीतील प्रस्तावित संभाव्य सदस्य खालील प्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मा. अपर आयुक्त | – | सभापती |
| 2. | मा. अति उपायुक्त | – | उप सभापती |
| 3. | मा. अति उपायुक्त (साप्रवि) | – | सदस्य सचिव |
| 4. | मुख्य कार्यकारी अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ | – | सदस्य |
| 5. | मा. अधिक्षक अभियंता | – | सदस्य |
| 6. | कार्यकारी अभियंता (प्रकल्प) | – | सदस्य |
| 7. | स.स.न.र. (ADTP) | – | सदस्य |
| 8. | स्थावर अधिकारी | – | सदस्य |
| 9. | सहा. संचालक (लेखा व वित्त ) | – | सदस्य |
| 10. | समाज कल्याण अधिकारी | – | सदस्य |
| 11. | विधी सल्लागार | – | सदस्य |

(2) **सल्लागाराची निवड** : जागा निवडीस मंजुरी प्राप्त झाल्यावर व मनपाव्दारे योजना राबविण्याचे निश्चित झाल्यावर (i) जागेचा विकास (पुरवावयाच्या भौतिक सुविधा जसे – डांबरी रस्ते, पावसाळी नाली, बाहय विद्युतीकाण, पाणीपुरवठा इत्यादीसह) (ii) बांधकामाची किंमत व (iii) मनपा भाडे व प्रशासकीय खर्च इत्यादीचा विचार करुन बांधकामाचा दर निश्चित करावा लागेल. शिवाय योजना साकार करण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, उपलब्ध क्षेत्रफळानुसार नकाशे तयार करणे गाळयांची संख्या व क्षेत्र ठरविणे, व्यवहार्यता अहवाल तयार करणे, प्रकल्प प्रारुप तयार करणे इत्यादीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करावी लागेल.

(3) **लाभार्थी निवड** : सदर योजना आर्थिक दृष्टया मागासलेल्या नागरिकांसाठी व मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी असल्याने स्वतःचे घर नसलेल्या व स्वतःचे एकटयाचे किंवा प्रति / पत्नी यांचे एकत्रित दरमहा उत्पन्न खालील पैकी असणाऱ्यांसाठी योजना राबविणे.
उचित होईल व त्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक असेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | अल्प उत्पन्न गट | – | दरमहा उत्पन्न | – | 8001 ते 20,000/– |
| (ब) | मध्यम उत्पन्न गट | – | दरमहा उत्पन्न | – | 20,001 ते 40,000/– |

इच्छुकांकडुन जाहिरातीव्दारे अर्ज मागवून सोडतीव्दारे निवडव प्रतिक्षा यादी तयार करावी लागेल. अर्ज मागवितांना म्हाडा चे धर्तीवर खालील बाबी आवश्यक करणे उचित होईल.

(i) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे उदाः वास्तव्याचा पुरावा, ओळखपत्र,बॅकखाते, उत्पन्नाचादाखला, मनपा क्षेत्रात स्वःताचे घर नसल्याचा पुरावा /हमीपत्र.
(ii) अर्जासोबत भरावयाची रक्कम
(iii) प्राथमिक अदायगी व विविध टप्प्यावर भरावयाची रक्कम
(iv) लाभार्थ्यांने करावयाची कर्ज उभारणी
(v) विविध अटी व शर्ती मान्यतेबाबत हमीपत्र

(4) **गाळयाचे आरक्षण** : शासनाचे धोरणानुसार म्हाडा चे धर्तीवर गाळयांची संख्या ठरल्यावर लाभार्थी निवडतांना खालील प्रमाणे आरक्षण आवश्यक राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | अनु.जाती | – | 11 % |
| (2) | अनु.ज.जा. | – | 6% |

| | | | |
|---|---|---|---|
| (3) | वि.जा./भ.ज. | — | 3% |
| (4) | पत्रकार | — | 2.5% |
| (5) | स्वातंत्र संग्राम सेनानी | — | 2.5% |
| (6) | अंध व अपंग | — | 3% |
| (7) | संरक्षणदलातील सैनिकांचे कुटूंब | — | 2% |
| (8) | माजी सैनिक व त्यांचे कुंटुंब | — | 5% |
| (9) | आजी माजी खासदार व आमदार | — | 2% |
| (10) | संस्थेचे व शासनाचे कर्मचारी | — | 9% |

उपरोक्त आरक्षणांनुसार अर्ज प्राप्त न झाल्यास लाभार्थ्याची निवड सक्षम प्राधिकाऱ्याचे मंजूरीने मुक्त गटातून करता येईल. यासंपूर्ण कामात म्हाडा ची मदत घेण्यात येईल.

**(ब) प्रस्तावित स्थळे :**

नागरिकांसाठी स्वस्त घरकुल योजना पुढील जागांवर राबविण्याचा प्रश्न विचारात घेणे —

| अ. क्र. | बंद शाळेचे नांव | क्षेत्रफळ | डी.पी. नुसार वापर | मालकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | रामदासपेठ मराठी प्राथ.शाळा | 839.80 | निवासी | म.न.पा. | — |
| 2. | भानखेडा मराठी प्राथ. शाळा | 680.60 | निवासी | म.न.पा. | घोषीत स्लम |
| 3. | जुनी मंगळवारी मराठी प्राथ. शाळा | 1025.50 | निवासी | म.न.पा. | घोषीत स्लम |
| 4. | बंगालीपंजा हिंदी प्राथ. शाळा | 901.80 | निवासी | म.न.पा. | — |
| 5. | कर्मविर शिंदे मराठी उच्च प्राथ. शाळा पाचपावली | 13216.10 | निवासी | म.न.पा. | घोषीत स्लम |
| 6. | तुकारात लांजेवार शाळा मौजा वडपाकड | 332.80<br>299.00<br>102.60 | निवासी | महा. शासन पटटेदार : म.न.पा. | — |

**(क) चटईक्षेत्र :**

उपरोक्त सर्व जागांचा विकास आराखडयानुसार निवासी वापर असल्याने चटईक्षेत्र 1.0 अनुज्ञेय आहे. घरकुल योजनेचा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळास मिळालेल्या परवानगी प्रमाणे नागपूर महानगरपालिकेला अतिरिक्त 1.5 चटईक्षेत्र मिळावा जेणेकरुन बांधकामकरिता 2.5 चटईक्षेत्र उपलब्ध होवू शकेल. याकरिता शासनाची मंजूरी घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील प्रमाणे दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>दुरुस्ती :—</u>**

3) अंत्यंत अल्प गट — दरमहा उत्पन्न — 0 ते 8000/— समावेश करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

4) खालील आरक्षण वगळण्यात येते.

(4), (5), (7), (8), (9),

(10) मध्ये म.न.पा.चे कर्मचारी अशी दुरुस्तीस मंजूरी प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. संस्थेचे व शासनाचे कर्मचारी वगळण्यांत येते तसेच इतर मागासवर्गीय आरक्षणाचा समावेश करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

या वरील दुरुस्तीसह विषय एकमताने मंजूरी प्रदान करते तसेच म.न.पा. सभेकडे सभागृहाच्या मंजूरी करीता सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 689</u> :– केबल डक्टचे जाळे तयार करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्याकरिता व तसेच आराखडयानुसार तयार झालेल्या केबल डक्टचे विविध टेलिकॉम एजेन्सीला भाडयाने वापरण्यास देण्याकरिता इन्फ्रास्ट्रक्चर सर्विस प्रोवाईडर ( Infrastructure Service Provider) ची नेमणूक करणे.

1. महानगरपालिकेच्या 2013–14 च्या अंदाज पत्रकामध्ये मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी मनपाच्या उत्पन्नामध्ये भर पडण्याच्या दृष्टीने केबल डक्टचे जाळे शहरात तयार करण्याकरिता धोरण प्रस्तावित केले आहे.

2. उपयोगात न येणाऱ्या जलवाहिन्या सिवर लाईन व तसेच पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या नाल्या उपरोक्त कामाकरिता उपयोगात आणू शकतो किंवा कसे या करिता E.O.I. मागविण्याची शिफारस आहे.

3. या संबंधात केबल डक्टचे जाळे तयार करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्याकरिता व तसेच आराखडयानुसार तयार झालेल्या केबल डक्टस विविध टेलिकॉम एजेन्सीला भाडयाने वापरण्यास देण्याकरिता इन्फ्रास्ट्रक्चर सर्विस प्रोवाईडर ( Infrastructure Service Provider) ची नेमणूक करणे आवश्यक आहे.

या संदर्भात इन्फ्रास्ट्रक्चर सर्विस प्रोवाईडरची नेमणूक करण्याकरिता सुधारित E.O.I. तयार करण्यात आलेला आहे. त्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन पूढील प्रक्रिया करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 690</u> :– नागपूर शहरातील अंदाजे 50 टन ओला कचरा उदा. टाकाऊ अन्न पदार्थ, भाजी पाल्याचा कचरा, कत्तलखान्याचा कचरा इत्यादीवर प्रक्रिया करून बायोगॅसची निर्मीती बांधा व वापरा (BOOT) तत्वावर करण्यास्तव खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून Expression of Interest काढण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निर्मिती, बांधा, व वापरा या तत्वावर E.O.I. काढण्यात यावा, E.O.I. काढतांना ज्या निविदाकारास कार्यादेश देण्यात येईल त्या निविदाकारा कडुन D.P.R. बनविण्यांत यावा सदर D.P.R. केन्द्र शासनाच्या योजना आयोगाकडुन मंजुर करुन घेण्यात यावा व मंजुर D.P.R. प्रमाणे प्रस्तावित योजना राबविण्यात यावी. या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. केंद्र सरकारच्या योजना आयोगाकडून अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी DPR तयार करून आयोगाला सादर करणे.
2. नविन DPR नुसार BOOT तत्वावर काम करण्यास्तव नविन प्रस्ताव मागविणे.
3. प्राप्त EOI नुसार BOOT तत्वावर काम करण्यास तयारी दर्शविणाऱ्या योग्य कंत्राटदारास मनपा जागेवर प्रकल्प उभारण्यास मंजुरी देणे.
4. केंद्र शासनातर्फे अनुदान प्राप्त झाल्यास प्रकल्प पूर्णत्वास नेऊन कंत्राटदाराने केलेल्या खर्चाचे भूगतान करणे व प्रकल्प मनपाच्या ताब्यात घेणे.

<u>ठराव क्रमांक 691</u> :– नागपूर म.न.पा. तर्फे ''नागपूर महोत्सव'' फरवरी 2014 ला यशंवत स्टेडीयम मैदानावर आयोजित आहे. या महोत्सवात सलग 5 दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. ही व्यवस्था करण्याकरीता ईव्हेंट मॅनेजमेंट कंपनी तर्फे EOI ची दि. 07. 02.2014 रोजी मागणी करण्यात आलेली होती. त्यामध्ये मे. कन्टेंट कॉन्सेप्ट कम्युनीकेशन व मे. ॲडमार्क इव्हेंट प्रा. ली. या दोन कंपनी पात्र ठरल्या होत्या परंतु त्यामध्ये दोन्ही फर्म ने कार्यक्रम सादर करण्याचे नमूद केले होते. प्रस्तुत आवेदने तपासले असता कोणते कलाकार येतील कार्यक्रमाचे स्वरूप काय राहील

याबाबत तपशील आढळला नाही यामुळे कार्यक्रमाचे सादरीकरणाबाबत सभ्रंम निर्माण झाला यामुळे प्रस्तुत संभ्रम दूर करून कार्यक्रमाचा दर्जा टिकून रहावा व सादरीकरण उत्कृष्ठ व्हावा यासाठी सामंजस्य मार्ग म्हणून दोन्ही पात्र संस्था यांचे मा. उपायुक्त यांचे कक्षात दि. 12.02.2014 रोजी सभा आयोजित केली. प्रस्तुत सभेत दोन्ही संस्थांना कार्यक्रमात कलाकारांचा समावेश करून दर देण्याचे निर्देश देण्यात आले या सहमती प्राप्त झाल्यावर दि. 15.02.2014 रोजी दोन्ही संस्थांनी आवेदने सादर केली. प्रस्तुत आवेदनाप्रमाणे कार्यक्रमनिहाय दर पत्रकाचा तुलनात्मक तक्ता सादर प्रस्तुत.

1) स्थानिक कलावंत कार्यक्रम

| अ.क्र. | बाब | **M/s Content Concert Communication** | **M/s Admaark Event Pvt. Ltd.** |
|---|---|---|---|
| 1 | स्थानिक कलावंत कार्यक्रम | 1404500/— | **1235960/—** |
| 2 | मराठी सिने आर्टीस कार्यक्रम | 2347460/— | **1797760/—** |
| 3 | हिंदी कवी संम्मेलन | **599440/—** | 730340/— |
| 4 | संगीत रजनी | **3247204/—** | 3258440/— |
| 5 | Fusion | 1741580/— | **1516860/—** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता M/s Content Concert Communication संस्थेचे क्रमांक 3 व 4 चे दर न्युनत्तम आहे तसेच क्रमांक 1, 2 व 5 चे दर M/s Admaark Event Pvt. Ltd. यांनी न्युनत्तम दिले आहे याकरीता उपरोक्त तक्त्यानुसार एकूण रू. 83,97,224/— रू. खर्च अपेक्षित असून याकरीता न्युनत्तम दर असलेले इव्हेंट कंपनीच्या न्युनतम दरास मंजुरी देणे. व त्याला येणारा रू. 83,97,224/— खर्चास अनुमती प्रदान करणे. हा खर्च पदक्र. 776 मधून करण्यात येईल.

**M/s Admaark Event Pvt. Ltd.**

1. स्थानिक कलावंत कार्यक्रम 1235960/—
2. मराठी सिने आर्टीस कार्यक्रम 1797760/—
1. Fusion 1516860/—

**M/s Content Concert Communication**

3. हिंदी कवी संम्मेलन 599440/—
4. संगीत रजनी 3247204/—

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन श्रेणीनुसार व कला प्रदर्शन करणाऱ्या कलावंतांच्या दर्जेनुसार विभागाने भुगतान करतांना ईव्हेंट मॅनेजमेंट कंपनी च्या देयकाची योग्य तपासणी करुनच भुगतान करावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 692</u>** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर